नियमित दिवाणी दावा क्रमांक १८१/२०२१ मधील नि.क्र.३९ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज, वादीतर्फे प्रतिवादी २ चे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होऊन होऊन मिळण्यासाठी दाखल केला आहे. वादीच्या म्हणण्यानुसार, मयत प्रतिवादी क्र. २ हिराबाई बळवंत शेंडगे ह्या दावा चालू असताना दिनांक १५.०४.२०२४ रोजी मयत झाले आहेत. दावा मिळकतीबाबत वादी व प्रतिवादी क्र. २ यांच्या दरम्यान वाद असून मयत प्रतिवादी क्र. २ यांच्या पश्चात त्यांच्या वारसांच्याविरुध्द वादींना दावा चालविण्याचा हक्क आहे. प्रतिवादी क्र. २ चा मृत्युचा दाखला वेळेत उपलब्ध न झाल्यामुळे प्रतिवादी क्र. २ चे वारस अभिलेखावर घेण्यास १ वर्षे, ०२ महिने, ११ दिवस उशीर झालेला आहे. सबब, प्रतिवादी २ चे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला झालेला विलंब माफ होवून मिळावा अशी विनंती केली आहे.

२. प्रतिवादी यांनी सदर अर्जास हरकत घेतली. प्रतिवादी यांच्या म्हणण्यानुसार, अर्जात नमूद केलेले कारण योग्य व बरोबर नाही, प्रतिवादी क्र. १ ने दिनांक ०५.०२.२०२५ रोजी प्रतिवादी क्र. २ हे मयत असल्याचा मृत्युचा उतारा दाखल केलेला आहे. वादीने अर्जात नमूद केलेले कारण चुकीचे आहे. सबब अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा.

३. प्रतिपक्षाच्या कथनांवरुन माझे समोर खालील मुद्दे उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष कारणांस त्यापुढे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी मागणी केल्यानुसार प्रतिवादी क्र. २ चे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफ होण्यास व अबेटमेंट सेटअसाईड होऊन मिळण्यास पात्र आहे काय? | होय. |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

का र ण मि मां सा

४. वादी व प्रतिवादींचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरुध्द दावा मिळकतीचा कब्जा मिळण्यासाठी व निरंतर ताकीदिसाठी दाखल केला आहे. अर्जातील कथनांवरुन वादी यांना प्रतिवादी क्र. २ चे वारस अभिलेखावर घेण्यास विलंब झाला आहे. प्रतिवादी क्र.२ चे वारसांना त्याचे पश्चात दावा चालविण्याचा हक्क असल्याने दावा गुणदोषावर चालणेसाठी प्रतिवादी क्र.२ चे वारस अभिलेखावर येणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. २ चे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होणे गरजेचे आहे. सबब मुद्दा नं.१ होकारार्थी देऊन मुद्दा नं. साठी खालील आदेश पारीत करीत आहे.

आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येते.

२. प्रतिवादी क्र. २ चे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब रक्कम रुपये ५००/- चे खर्च वादीने प्रतिवादीस देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

VAIBHAV BAJRANG GHADAGE
Digitally signed by VAIBHAV BAJRANG GHADAGE
Date: 2025.10.01 17:43:03 +0530

( व्ही. बी. घाडगे )

दिनांकः- ०१.१०.२०२५

दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, वडूज.